मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात दाखल पुनरिक्षण अर्जावरील आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

सामान्य प्रशासन विभाग-१

जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-२/५८५०१३/१७७/२०२६

अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा :- १. इकडील कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-१/आस्था-२/४५३/२०२१ दिनांक - ३०.१२.२०२१

२. गट विकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांचे कडोल पत्र के वशि/आस्था/१४/२०२१ दिनांक १३.०१.२०२१ अन्वये श्री.कंगे यांचा खुलासा दि.१२.०१.२०२२

३. इकडील आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-२/१९२१/२६/२०२२ दिनांक - २४.०१.२०२२

४. इकडील दोषारोप क्र.साप्रवि-१/आस्था-२/१९२१/२७/२०२२ दिनांक २४.०१.२०२२

५. इकडील आदेश क्र.साप्रवि-१/अस्था-२/१९२१/६८/२०२२ दिनांक ०३.०३.२०२२

६. इकडील अतिंम कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-१/आस्था-२/१९२१/५९९/२०२२ दिनांक - ३०.११.२०२२

७. या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-२/१९२१/७६/२०२३ दि.२०.०२.२०२३

८. मा. अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील अपिल अर्ज क्र १३/२०२३ जा.क्र.६७९२ दिनांक १२.०६.२०२३

९. कक्ष अधिकारी,ग्रामविकास विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र.डिईएन - २०२३/प्र.क्र.२६२/आस्था-१२ दिनांक २९.०४.२०२६ समवेत राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज महाराष्ट्र राज्य यांचेकडील अपिल आदेश दिनांक २२.०४.२०२६

श्री. दिपक भगवान कंगे, हे वरिष्ठ सहाय्यक या पदावर सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर, येथे कार्यरत असताना बनावट जन्म दाखला सादर केल्याने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ७ च्या आदेशान्वये श्री. दिपक भगवान कंगे, यांची **"समय श्रेणीतील निम्न स्तरावर आणणे"** ही शिक्षा करणेत आलेली होती.

श्री. दिपक भगवान कंगे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, यांनी संदर्भ क्रमांक ७ च्या आदेशाविरुध्द मा. अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडेस अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी होवून संदर्भ क्र. ७ अन्वये देण्यांत आलेली शिक्षा संदर्भ क्र.०८ अन्वये कायम करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र. ८ अन्वये श्री.कंगे यांचे विरुध्द शास्ती आदेश पारीत केलेला असल्याने संदर्भ क्र.०७ च्या आदेशामध्ये कोणताही हस्तक्षेप करण्याची आवश्यक्ता नसल्याने शिक्षेचे आदेश कायम राहिलेला आहे.

उक्त नमुद शिक्षेच्या आदेश व मा.अपर आयुक्ताचे निकालाचे अनुषंगाने श्री.कंगे यांनी मा.राज्यमंत्री, ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांच्या न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक २० एप्रील २०२६ रोजी सुनावणी होवून संदर्भ क्र. ९ चे पत्रान्वये मा.राज्यमंत्री, ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांच्या न्यायालयाचे निकालपत्र दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील तरतुदीनुसार आदेश देणेत आहेत.

१. अपिलार्थी श्री. दिपक भगवान कंगे यांचे अपील अशंत: मान्य करण्यात येत आहे.
२. अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे दि.०९.०६.२०२३ रोजीचे आदेश रद्द करण्यांत येत आहेत.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) याचे दि. २०.०२.२०२३ रोजीच्या आदेशातील " **निम्न वेतनश्रेणीवर आणणे** " या शिक्षेऐवजी " **दोन वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता तात्पुरत्या स्वरुपात रोखणे** " अशी सुधारित शिक्षा पूर्वलक्षी प्रभावाने (Retrospective Effect) देण्यांत येत आहे.
४. सदर आदेशाची नोंद श्री. दिपक भगवान कंगे, सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक 20260612040108 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 09-06-2026 21:55:43
आनंद भंडारी, (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. दिपक भगवान कंगे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती नेवासा.

द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा.

२/- सदरचा आदेश श्री.कंगे यांना बजावणेत येवून दिनांकित पोहोच आणि सदर आदेशाची नोंद मुळ सेवा पुस्तकात घेणेत येवून नोंद घेतलेल्या मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठाची छायांकित सत्य प्रत या कार्यालयास उलटटपाली सादर करावी.

प्रत:- अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहिती सादर.

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर.